# कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण

मा. शरदचंद्रजी पवार मुख्य बाजार आवार, एन टाईप इमारत, १ ला मजला
कल्याण- शिळ रोड कल्याण (प) जि. ठाणे ४२१ ३०१
दुरध्वनी क्रमांक (०२५१) २९७०३१६ e mail :- apmckalyan@rediffmail.com

जा. क्र. कृऊबास/कल्याण/जाहिर सुचना/ १८२७ /२०२५ दिनांक :- २८/०३/२०२५

## जाहिर सुचना

कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती कल्याण भाजीपाला बाजार विभागातील "बी-४" टाईप इमारत तळ मजल्यावर २० ओटे/गाळे बांधकाम व बाजुचे रस्ते काँक्रीटीकरण करु इच्छित आहे. सदरहू बांधकामासाठी लागणारी रक्कम इच्छुक ओटे/गाळेधारकांकडुन अनामत रक्कम जमा करुन त्या रक्कमेतुन बांधकाम करण्यात येणार आहे. प्रत्येक नियोजीत ओटे/गाळ्यांसाठी कमीत कमी अनामत रक्कम (डिपॉझीट) निश्चित दरमहा भाडे (मागणी अर्जात) नमूद केलेप्रमाणे सर्व अटि/शर्ती सर्व स्वारस्याची अभिव्यक्ती फॉर्ममध्ये नमुद केलेली आहे. दुकान ओटे/गाळे/कार्यालय घेऊ इच्छिणा-यांकडून येणारे अर्ज/ स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest) मागविण्यात येत आहे.

स्वारस्याची अभिव्यक्ती फॉर्म समितीचे कार्यालयात शुक्रवार, दि. ०४/०४/२०२५ पर्यंत रक्कम रु.१०००/- मात्र रोखीने अथवा कल्याण कृषि उत्पन्न बाजार समितीचे नावाने काढलेल्या धनाकर्ष/ पेऑर्डर ने भरणा केल्यानंतर कार्यालयीन वेळेत मिळतील. सविस्तर निविदा सुचना बाजार समितीचे apmckalyan.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे. स्वारस्याची अभिव्यक्ती अंतर्गत भरलेले अर्ज सिलबंद पाकिटामध्ये बाजार समितीचे कार्यालयात सोमवार दि. ०७/०४/२०२५ रोजी सकाळी १०.३० पर्यंत स्विकारले जातील. ओटे/गाळे घेऊ इच्छिणा-यांना बांधकाम नकाशा बाजार समितीचे कार्यालयात पहावयास मिळेल. सोमवार दि. ०७.०४.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता सर्वांसमक्ष बाजार समितीस प्राप्त झालेले सिलबंद अर्ज उघडण्यात येऊन सर्वात जास्त बोली लावणारे इच्छुकांना बाजार समितीने ठरविलेली अटी व शर्ती नुसार ओटे/ गाळे मंजुर करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

कोणतीही स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज स्विकारणे /नाकारणे अधिकार कोणतेही कारण न देता कल्याण कृषि उत्पन्न बाजार समितीने राखुन ठेवले आहेत.

कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती कल्याण जि. ठाणे

सही/-
**सभापती**
**(दत्तात्रय मोतीराम गायकवाड)**
कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण
जि. ठाणे